मे मॉईल लिमीटेड, पाथरी रेती खाण, पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा, खाण क्षेत्र 40.41 हेक्टर येथील बजरी (नदीची वाळू) 50,000 घनमिटर/वार्षिक ते 1,00,000 घनमिटर/वार्षिक वाढीव उत्पादनाकरीता आवश्यक पर्यावरण विषयक अनुमतीकरीता जाहीर लोकसुनावणी दि. ०६/०२/२०२४. वेळ दुपारी १.०० वाजता चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाची, अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार मे मॉईल लिमीटेड, यांच्या पाथरी रेती खाण, पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा, खाण क्षेत्र 40.41 हेक्टर येथील बजरी (नदीची वाळू) 50,000 घनमिटर/वार्षिक ते 1,00,000 घनमिटर/वार्षिक वाढीव उत्पादनाकरीता आवश्यक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ०६/०२/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता, पाथरी ग्रामपंचायत कार्यालय, ता. तुमसर, जि. भंडारा, येथे मा. श्री. दर्शन निकाळजे उपविभागीय दंडाधिकारी, तुमसर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. मनोज वाटाणे, क्षेत्र अधिकारी, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळ, नागपूर यांचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस मा. अनय नांवदर (भा.प्र.से.), उप-विभागीय अधिकारी मोहाडी हे उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १.०० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-1).**

## पार्श्वभूमी

मे मॉईल लिमीटेड यांनी त्यांच्या पाथरी रेती खाण, पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा, खाण क्षेत्र 40.41 हेक्टर येथील बजरी (नदीची वाळू) 50,000 घनमिटर/वार्षिक ते 1,00,000 घनमिटर/वार्षिक वाढीव उत्पादनाकरीता पर्यावरण अनुमतिसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास पत्र दि. १६/०९/२०२३ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं. **MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-231120-FTS-0248 date.** 20/11/2023 अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील

तरतुदीनुसार दिनांक ०४/०१/२०२४ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. ई-१०२/२०२४ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-240112-FTS-0037 dtd.12/01/2024 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र**-3). मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी आदेश क्रं. 70/2024, दि. ०५/०२/२०२४ अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, तुमसर यांना सदर समितीचे अध्यक्ष म्हणून प्रधिकृत केले. **(सहपत्र-४)**.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धांरकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. मा. जिल्हाधिकारी, भंडारा.
२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा.
३. मा. व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र , भंडारा.
४. उप-विभागीय अधिकारी, तुमसर, जि. भंडारा.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय तुमसर, जि. भंडारा.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
९. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी मे. मॉईल लि यांना प्रस्तावित प्रकल्पांबाबत तांत्रीक सादरीकरणासाठी आंमत्रित केले.

मे मॉईल लिमीटेड यांनी त्यांच्या पाथरी रेती खाण, पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा, खाण क्षेत्र 40.41 हेक्टर येथील बजरी (नदीची वाळू) 50,000 घनमिटर/वार्षिक ते 1,00,000 घनमिटर/वार्षिक वाढीव उत्पादनाकरीता पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रस्तावित रेती खाणाची माहीती, खाणकाम पध्दत, पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

जनसुनावणी दरम्यान संरपच, पाथरी यांनी लेखी निवेदन सादर केले त्याचप्रमाणे ६/२/२०२४ रोजी, ईमेल व्दारे प्रकृती फांऊडेशन, चंद्रपूर यांचा आक्षेप प्राप्त झाले असून सोबत जोडलेले आहे. **(सहपत्र-५).**

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

| अ. क्र. | नाव | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती विदया कोहरे, सरपंच, ग्रामपंचायत पाथरी, ता. तुमसर, जि. भंडारा. | यांनी लेखी निवेदन सादर केले त्याचप्रमाणे मागणी केली की,<br>१) शासनाने प्रदान केलेल्या प्रमाणानुसारच रेतीचे उत्खनन व्हावे कारण परिसरामध्ये पाण्याची टंचाई निर्माण होत आहे व गांवामध्ये पाणी टंचाई आहे.<br>२) नदी काठावर विहिर/पंप हाऊस/इंटक वेल अंडर ग्राऊंड सर्फेस वॉटर पाईप लाईन व सोलर प्लॉट.<br>३) पाणी सुध्दीकरण करण्याकरीता फिल्टर प्लॉट.<br>४) पाथरी गांवाचा विस्तारीकरणाचा व्याप ५ टोले असून पिण्याच्या पाण्याची असुविधा असल्यामुळे हनुमान नगर/रामनगर/बावनथडी वॉटर टॅक.<br>५) रेती उत्खनन होत असलेल्या रॉयल्टीच्या आर्थीक वर्षाची १५ टक्के रक्कम ग्रामपंचयातीला मिळण्याबाबद.<br>६) रेती साठा होत असलेल्या जागेचा ग्रा.पं. ला औद्योगीक कर मिळण्याबाबद.<br>७) गट क्रं. ५२३ मध्ये ओपन जिम/क्रिडांगण, व्यायाम व योगासन तसेच पुर्ण प्लॉटला आवारभिंत करणे.<br>८) गट क्रं. २३९ मध्ये आठवडी बाजार सुविधेकरीता आवारभिंत करणे.<br>९) पाणी टँकर मिळण्याबाबद.<br>१०) शाळेच्या पाटांगणात गट्टु लावणे.<br>११) पावसाळयात विदयार्थ्यांना | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जेवणाकरीता व्हरांडयात टिनाचा शेड लावणे.<br>१२) विदयार्थ्यांसाठी मुताऱ्या व संडास बांधकाम.<br>१३) विदयार्थ्यांसाठी ४० लेझीम. शाळेसाठी **White board.**<br>१४) वर्ग १ ली व २ री साठी ४० डेक्स व बेंच लहान, वर्ग १ ते ७ खोल्यांची रंगरगोटी करणे.<br>१५) संगणक ५ व १ प्रिंटर. शाळेसाठी **Dice** गावामध्ये **High mask light** गावामध्ये ॲरो.<br>१६) रुग्नवाहिका वाहन तसेच आरोग्य विषयक सुविधा.<br>१७) महिला बचत गटांसाठी गृहउदयोग ट्रेनिंग. | |
| २ | श्री. ज्ञानेश्वर शिवणे, पाथरी | • गावातील सुशिक्षित डिप्लोमा अभियांत्रीकी व आय टी आय तरुणांना प्रशिक्षण देण्यात यावे.<br>• प्रकल्पास पाठिंबा दर्शविला. | |
| ३ | श्री. रतिराम खुणे, माजी सरपंच, ग्रा. पं. पाथरी | १) पावसाळा व्यतिरिक्त इतर हंगामात बावनथडी नदी अंतर्गत प्रवाहाव्दारे वाहत असते. नदीतील वाळूची जेवढी उपसा होईल त्याप्रमाणात पाण्याचा स्त्रोत कमी होईल व इथल्या शेतकऱ्यांना शेतीसाठी जल सिंचनाकरीता मोठया प्रमाणात त्रास होईल.<br>२) लागूनच मध्यप्रदेश क्षेत्रातून अतोनात रेती उपसा होत आहे याकडे शासनाचे लक्ष नाही. पाथरी गांवामध्येच मोठयाप्रमाणात रेती साठवून ठेवली आहे याचा पाठपुरावा करुन ग्रामवासी थकले, आंदोलन केले परंतु काही निष्पन्न झाले नाही. शासनाच्या रेती निर्गती धोरणानुसार रेती उपलब्ध नसून सर्व चोरीची रेती मिळत आहे, यावर कोणी लक्ष घालत नाही. विनंती करण्यात येती की, मॉईलला रेती देण्यास हरकत नाही परंतु अवैध वाळू उपसा व रेती डंपीगवर रोख असल्यास पाहीजे.<br>३) रेती तस्कर नदीपात्रामध्ये तिन ते चार मिटर खोल रेती जेसीबी व्दारे उपसा करीत आहे त्यामुळे पाण्याचा स्त्रोत कमी होत आहे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री. नविन गौरे, पाथरी | मॉईल रेती खाणीपासुन गांवच्या लोकांना रोजगार मिळत आहे म्हणून प्रकल्पास पांठिबा दर्शविला. | |
| ५ | श्री. विजय नेवारे, पाथरी. | प्रकल्पास सहमती दर्शविली. | |
| ६ | श्री. अश्विन तुलाराम गौरे, पाथरी. | प्रकल्पास सहमती दर्शविली. | |
| ७ | श्री. बेणीराम करकाडे, पाथरी. | माझ्या शेतीच्या बांधामधून मॉईल चा रस्ता गेलेला आहे. रेती वाहतुक होत आहे. सात वर्षे झाले अदयाप भरपाई मिळाली नाही. याबाबत कारवाई व्हावी. | |
| ८ | श्री. इकेश रामजी पंजीपात्रे, पाथरी | रेतीघाटास सहमती आहे. पाथरी गांवामध्ये शिक्षणाची व आरोग्याची सुविधा व्हावी. | |
| ९ | श्री. अजय राजेंद्र देशमुख, पाथरी | १) गावामध्ये ८०% लोक शेती करतात. जसा पाण्याचा स्त्रोत कमी होईल तसा शेंतकऱ्यांना शेती करण्यासाठी मोठा त्रास होईल याची दखल घेण्यात यावी.<br>२) तरुण पिढीसाठी रोजगाराची व्यवस्था करण्यात यावी. | |
| १० | श्रीमती मंदा गौरे, ग्रामपंचायत सदस्य, पाथरी | रेती वाहतुकीमुळे झालेल्या अपघांतावर काय कारवाई करणार. | |
| ११ | श्री. राहुल राऊत , पाथरी | रेती काढण्यास हरकत नाही परंतु गांवामध्ये पिण्याच्या पाण्याची मोठी किल्लत आहे त्याची सोय करण्यात यावी. | |
| १२ | श्री. लालकुंवर चंद्रभान डोंगरे, पाथरी | रेती उत्खननास सहमती दर्शविली. | |
| १३ | श्री. शेखर कोतपल्लीवार, माजी. जि.प. सदस्य. | १. मॉईलच्या रेतीखाणीमुळे तिन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना नोकरी व अनुदान मिळून न्याय मिळाला.<br>२. मध्यप्रदेशमधील रेती माफीया नदीच्या पुलाजवळच रेती उपसा करीत होते व पुलाला धोका झाला होता. माझ्या निवेदनामुळे ते उपसा बंद झाले.<br>३. बावनथडी नदीवरील पुल बंद पडलेला असुन तो दुरुस्तीसाठी लवकरात लवकर लक्ष दिले पाहीजे.<br>४. नदीवरील बायपास रपटा सुध्दा नादुरुस्त आहे.<br>५. जवळच्या सहा गांवाना दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे.<br>६. **CSR** अंतर्गत गांवाच्या मागण्या पूर्ण कराव्या.<br>७. ग्रां.प. पाथरीला टॅंकर व्दारे पाणी पुरविण्यात यावे.<br>८. रेती उत्खनन व वाहतुकीमुळे धुळीचा मोठा त्रास होतो त्यावर उपाययोजना | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावी. | |
| १४ | श्री. प्रशांत करैय्या, कार्यकारी निर्देशक, मॉईल (Executive Director) | | १. ग्रां. प. पाथरी, संरपंच यांच्या मागण्या **CER/CSR** फंडामधून शक्यतोवर पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. शाळेच्या मुलांसाठीच्या मागण्याना स्विकृती देण्यात येत आहे.<br>२. ट्रेंनिग साठी ॲप्रेंटिस ॲक्ट मध्ये प्रावधान केले आहे की स्थानिक लोंकाना शिक्षणासाठी प्राधान्य देण्यात येईल. पुढच्या वर्षापासुन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.<br>३. रेती उत्खननासाठी पर्यावरण नियमांचे पालन करण्यात येईल. मॅन्यूअली रेती काढण्यात येऊन ट्रॅक्टर व्दारे वाहून नेण्यात येईल.<br>४. वाढीव रेती उत्खननामुळे रोजगाराच्या संधी वाढतील, खाणीचा सुध्दा विस्तार होत आहे म्हणून रोजगाराच्या अजून संधी निर्माण होईल. स्थानिक लोंकाना रोजगाराची संधी मिळेल तसेच **indirect** रोजगाराच्या संधी निर्माण होईल व गावाची आर्थिक उन्नती होईल.<br>५. धुळीच्या नियंत्रणासाठी पाणी शिपडण्याची व्यवस्था करण्यात येईल.<br>६. पिण्याच्या पाण्यासाठी मागणीप्रमाणे विहीर खोदण्यासाठी प्रयत्न करु. |

**मा. अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

रेतीघांटाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यात आले आहे. जनतेच्या सुचना व मागण्यांना मॉईल तर्फे उत्तर देण्यात आले. ठरवून दिलेल्या परिमाणाप्रमाणे मॉईल तर्फे रेती उत्खनन करण्यात येईल. शाळेच्या मागण्याबाबत मॉईल सकारात्मक विचार करेल. गांवच्या विदयार्थांना तांत्रीक प्रशिक्षणासाठी मॉईल सकारात्मक आहे. स्थानिंकाना रोजगार, पिण्याचा पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला असून मॉईलकडून त्यावर विचार करतील. धुळीच्या नियंत्रणासाठी मॉइल ने योग्य काळजी घ्यावी व गावाच्या मागणींचा मॉईलने विचार करावा अशी विनंती करण्यात येत आहे.

आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(श्री. दर्शन निकाळजे)**
**उपविभागीय दंडाधिकारी, तुमसर व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**